# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, ३०२३३४७१/८४

E-Mail :- desk15@dtemaharashtra.gov.in internet:- http://www.dte.maharashtra.gov.in


अत्यंत महत्वाचे

क्रमांक : १५/अर्थसं/अर्थ.अंदाज/२०१९-२०/ ५८

दिनांक : 8 AUG 2019

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

२) संचालक/प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये

३) प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतने

विषय :- सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज (अनिवार्य खर्च) प्रस्ताव पाठविणेबाबत...
(मुख्य लेखाशिर्ष २२०३ - तंत्रशिक्षण, मागणी क्र. डब्ल्यू-३) (अनिवार्य खर्च)

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज सादर करणे आवश्यक आहे. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्थांचा खर्च भागविण्यासाठी शासनाकडून तरतूद उपलब्ध करून घेण्यासाठी, अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना सदरहू पदांच्या आढाव्यानुसार व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे, स्थायी / अस्थायी तसेच वर्ग निहाय पदे जुळवून शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या पदांचे अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंर्तभूत करुन (पद निर्मीतीचे शासन निर्णयाच्या प्रतीसह) सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात योजनानिहाय (CRC Wise) अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांनी सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्यक्ष उपस्थित रहावे.

तसेच सदरहू अर्थसंकल्पीय अंदाज तयार करतांना खालील बाबी लक्षात घेऊन अंदाजपत्रक तयार केलेले असावे.

१. संबंधित विवरणपत्रातील आकडेवारी हजारात दर्शविण्यात यावेत.(पूर्ण रुपयात आकडेवारी सादर करण्यात येऊ नये)

२. रिक्त असलेल्या स्थायी/ अस्थायी पदांसाठी मूळ वेतनाचे १० टक्के प्रमाणे परिगणना करुन तसेच ७ व्या वेतन आयोगानुसार संभावित महागाई भत्ता सन २०१९-२० करीता सुधारीत अंदाजासाठी २०% व सन २०२०-२१ करीता अर्थसंकल्पीय अंदाजासाठी २५% दराने वाढ गृहित धरुन अंदाजपत्रक सादर करावे.

३. संबंधित उपलेखाशिर्षातील उद्दिष्ट निहाय परिगणना करुन अंदाजपत्रक सादर करावे. (अंदाजीत आकडेवारी सादर करण्यात येऊ नये.)

४. शासकीय स्वायत्त संस्थेला कळविण्यात येते की, शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. ( संबंधित संस्थेच्या नियामक मंडळाने नियुक्त केलेल्या अधिकरी/कर्मचारी यांच्या वरील खर्चासाठी अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात येऊ नये.)

५. शासकीय अभियांत्रिकी / औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालये व शासकीय तंत्रनिकेतने व तत्सम संस्था (पदवी व पदविका) संस्थेला कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिनांक ०१ मार्च, २०१९ रोजी निर्गमित केलेले राजपत्रात नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या आधिन राहून अर्थसंकल्पीय अंदाज तयार करुन सादर करावे.

६. पदांच्या आढाव्यानुसार वर्ग-४ साठी मंजूर असलेल्या पदांचा खर्च भागविण्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद करण्यात यावी. (मंजूर पदे वगळून कंत्राटी सेवा (१०) या उद्दिष्टांतर्गत सुरक्षा रक्षक, माळी, सफाईगार, वाहन चालक इत्यादी पदांचा सेवा बाह्ययंत्रणेकडून काम करुन घेण्याबाबत शासन निर्णयानुसार मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन संबंधित विभागाची/प्रशासकीय विभागाची मंजूरी शिवाय यावर होणा-या खर्चासाठी अंदाजपत्रकात नमूद करण्यात येऊ नये.) प्रशासकीय विभागाची मंजूरी असल्यास सदरहू आदेश सोबत जोडावे.

७. सामग्री व पुरवठा (२१) या उद्दिष्टांवरील खर्च भागविण्यासाठी खरेदी विषयक संबंधिचे आवश्यक कागदपत्राची पुर्तता करुन अंदाजपत्रकासोबत जोडावे.

८) व्यावसायिक सेवा (२८) या उद्दिष्टांवरील खर्च भागविण्यासाठी संबंधित संस्थेसाठी एकूण मंजूर केलेल्या शिक्षकीय पदांपैकी रिक्त असलेल्या पदांचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या अधिभारानुसार परिगणना करुन सोबत जोडलेल्या विवरणपत्रात आकडेवारी नमूद करुन अंदाजपत्रक सादर करण्यात यावेत.

९) ज्या पदनामाना ७ वा वेतन आयोग लागू केला नसेल, त्या पदनामांचे ६ व्या वेतन आयोगानुसारच अंदाज पत्रक सादर करण्यात यावे.

१०) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाची प्रत संबंधित सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे कडे तपासणी/ प्रमाणित करुन सादर करावी.

सोबत :- विवरणपत्रे

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

प्रत: माहिती व पुढील कार्यावाहीसाठी -

१) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई. २) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, मुंबई. ३) सचिव, प्रवेश नियामक प्रधिकरण, मुंबई. यांना कळविण्यात येते की, सदरहू अंदाजपत्रक विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

४) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई -५१ यांना कळविण्यात येते की, आपले व आपल्या अधिपत्याखालील विभागीय तंत्रशिक्षण परिक्षा मंडळाचे अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

५) लेखा अधिकारी, का.क्र.६, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, या संचालनालयातील विविध कार्यासनातील अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

६) कार्यासन अधिकारी, का.क्र. ७, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित पदवी व पदविका व तत्सम संस्थाची अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

७) कार्यासन अधिकारी, का.क्र. १६, मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, शासकीय अधिकारी /कर्मचारी इत्यादीना कर्जे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्थसंकल्पीय अंदाजाची माहिती संकलीत करुन या कार्यासनाकडे विहित मुदतीत सादर करण्यात यावे.

तसेच उपरोक्त निर्देशित केल्यानुसार विहित मुदतीत माहीती सादर न केल्यास अनुदानाबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित कार्यासनाची राहील.